بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in

محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआनची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

# प्रत्येक अहमदिला प्रत्येक अत्याचारापासून सुरक्षिततेसाठी आणि अत्याचारींची पकड होण्यासाठी पवित्र रमजान मध्ये प्रार्थनेचे आवाहन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ३१ मार्च २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشۡهَدُ أَنۡ لَّا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيۡطٰنِ الرَّجِيۡمِ۔
بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ مٰلِكِ يَوۡمِ الدِّيۡنِ۔ إِيَّاكَ نَعۡبُدُ وَإِيَّاكَ
نَسۡتَعِيۡنُ۔ اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِيۡمَ۔ صِرَاطَ الَّذِيۡنَ أَنۡعَمۡتَ عَلَيۡهِمۡ غَيۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَيۡهِمۡ وَلَا الضَّآلِّيۡنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठण केल्यानंतर, हुजूर अनवर म्हणाले: आजकाल आपण रमजानच्या महिन्यातून जात आहोत. हा एक असा महिना आहे ज्यामध्ये आध्यात्मिक वातावरण वावरत असतो. प्रार्थनाबरोबरच उपासनेवरही अधिक भर असतो. पवित्र कुरआन वाचणे आणि ऐकणे यावर लक्ष केंद्रित केले जाते. जर तुम्हाला उपवासाचे खरे फायदे मिळवायचे असतील तर तुम्ही पवित्र कुरआन वाचण्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. रमजानचा पवित्र कुरआनशी विशेष संबंध आहे. अल्लाह पवित्र कुरआनमध्ये म्हणतो: रमजानचा महिना हा महिना आहे ज्यामध्ये पवित्र कुरआन अवतरले होते, तो पवित्र ग्रंथ जो सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शन म्हणून पाठवले गेले होते.

काही विश्वासार्ह परंपरा असेही सांगतात की पवित्र प्रेषित (स.) यांना पहिला साक्षात्कार २४ रमजानच्या दिवशी झाला होता. प्रत्येक रमजानमध्ये जिब्रील (अ.स.) पवित्र प्रेषित (स.) सोबत पवित्र कुरआनचे पूर्ण पठन करायचे आणि शेवटच्या रमजानमध्ये दोनदा पठन केले. या महिन्यात सर्वांनी पवित्र कुरआन वाचणे, त्याचे भाष्य वाचणे आणि ऐकणे यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. पवित्र कुरआनचा दर्स आणि भाष्य एम.टी.ए वर देखील प्रसारित होतात त्यादेखील ऐकले पाहिजे. जर आपण कुरआन पठन करत असताना त्यासोबत त्याचे भाषांतर आणि भाष्य वाचले, तरच आपल्याला त्यात सांगितलेल्या आदेशांचे महत्त्व समजू शकते, आणि त्यांना समजून आम्ही त्यांना आपल्या जीवनाचा भाग बनवू शकतो आणि कुरआनच्या शिकवणीनुसार आपले जीवन जगू शकतो. आणि अल्लाहच्या प्रसन्नतेचे लाभ घेऊ शकतो. म्हणून, जर आपल्याला रमजानचा खरा आशीर्वाद प्राप्त करायचे असेल तर पवित्र कुरआनचे पठण आणि त्यावर चिंतन करण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. अपेक्षित मसीह (अ.स.) च्या वचनांचे वारंवार वाचन करणे आवश्यक आहे जेणेकरुन आपल्याला पवित्र कुरआनची शिकवण योग्यरित्या समजू शकेल.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, अल्लाहचे सद्सदविवेक आणि आदेश दोन प्रकारचे आहेत. काही कायमस्वरूपी आणि शाश्वत असतात आणि काही काळाच्या गरजेनुसार जारी केल्या जातात, जरी त्यांना त्यांच्या जागी एक स्थायीस्थिती असते. उदाहरणार्थ, प्रवास करताना प्रार्थना किंवा उपवासाशी संबंधित आज्ञा

आहेत, आणि स्थायीस्थितीत इतर आदेश आहेत. प्रवास करताना प्रार्थना जमा करणे किंवा कमी करणे आदेशित आहे, तर सामान्य परिस्थितीत ती पूर्णपणे अदा करणे आवश्यक आहे. अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, तोराह आणि बाईबलच्या आज्ञा काळाच्या गरजेनुसार होत्या आणि पवित्र पैगंबर (स.) जी शरियत आणि पुस्तक घेऊन आले होते ती प्रस्थापित व शाश्वत शरियत आहे. त्यात जे वर्णन केले आहे ते परिपूर्ण आणि दोषमुक्त आहे. पवित्र कुरआन हा अक्षय्य कायदा आहे आणि तोराह व बाईबल, जरी पवित्र कुरआन आले नसते तरीही (कालांतराने) रद्द केले गेले असते, कारण ते अचल आणि शाश्वत कायदे नव्हते या उलट पवित्र कुरआनची शिकवण परिपूर्ण आहे आणि त्यातील आदेश व सूचना सर्व काळासाठी आहेत. हजरत अपेक्षित मसीह स्वतःच्या आगमनाचे हेतू आणि पवित्र कुरआनाचे परिपूर्णतेबद्दल सांगतात की, माझ्या येण्याचे कारण आणि हेतू फक्त इस्लामचे नूतनीकरण आणि समर्थन करणे आहे. प्रेषित मुहम्मद (स.) द्वारे शरियत आणि प्रेषितत्व संपन्न झाले. आता यापुढे कोणतीही शरियत येऊ शकत नाही. पवित्र कुरआन खातमुल-कुतूब आहे, त्यामध्ये एक अक्षर किंवा शब्दही कमी-जास्त करण्याची गरज नाही. पवित्र प्रेषित (स.)चे आशिष आणि आशीर्वाद आणि पवित्र कुरआनची शिकवण आणि मार्गदर्शनचे फळ संपले नाहीत. ते प्रत्येक काळासाठी ताजातवाना उपस्थित आहेत आणि याच आशिष आणि आशीर्वादांच्या पुष्टीकरणासाठी परमेश्वराने मला उभे केले आहे.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, पवित्र पैगंबर (स.)अल्लाहकडून ज्ञान प्राप्त करून सर्वांना उद्देशून म्हणाले, ''तू म्हण की, हे लोकहो! मी तुम्हा सर्वांसाठी अल्लाहकडून प्रेषित होऊन आलो आहे.'' (अल-अराफ: १५९) म्हणून, पवित्र कुरआन अशा सर्व शिकवणींना सामावून, जे गतकाळात कोणत्या ना कोणत्या प्रकारे आदेशित होते, अवतरित होणे आवश्यक होते आणि सर्व सत्यवचने जे वेगवेगळया प्रेषितांद्वारे पृथ्वीवरील रहिवाशांपर्यंत प्रसारित करण्यात आली, यांचा समावेश होणे आवश्यक होते. सर्वशक्तिमान अल्लाहच्या आदेशाने पैगंबराची घोषणा की, मी संपूर्ण जगासाठी अल्लाहचा दूत आहे, हा एक पुरावा आहे की पवित्र कुरआन संपूर्ण जगासाठी मार्गदर्शनाचा स्त्रोत आहे.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: पवित्र कुरआन हे तत्वज्ञ आणि शाश्वत शरीयत आणि सर्व शिकवणींचे भांडार आहे. अशा प्रकारे, पवित्र कुरआनचा पहिला चमत्कार म्हणजे त्याची उच्चस्तरीय शिकवण आणि दुसरा चमत्कार हे त्याचे भव्य भविष्यवाण्या आहेत. पवित्र पैगंबराचे मक्केतील जीवन, भविष्यवाण्यांनी व्यापलेली होती. त्यानंतर तेराशे वर्षांनंतर प्रस्थापित झालेल्या भविष्यवाण्या आणि त्या काळातील चिन्हांची ईशवाणी किती भव्य आणि अत्योच्च आहेत अर्थात अपेक्षित मसीह व महदीच्या काळातील भविष्यवाण्या आजही त्या पूर्ण होत आहेत. जगातील कोणतेही पुस्तक या भविष्यवाण्यांची बरोबरी करू शकत नाही. अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की पवित्र कुरआनमध्ये सर्वस्वी आदेश करण्यात आले आहे की, तर्क, समज, विवेक आणि श्रद्धेने कृती केली पाहिजे. पवित्र कुरआन आणि इतर पुस्तकांमध्ये हाच फरक आहे आणि कोणत्याही पुस्तकाने आपली शिकवण तर्क आणि विवेक आणि स्वतंत्र टीकापुढे ठेवण्याची हिंमत केलेली नाही. कुरआन शरीफ एक सुरक्षित पुस्तक आहे. सर्वशक्तिमान अल्लाह  म्हणतो की, हे नक्कीच एक सन्माननीय कुरआन आहे, त्याचे अस्तित्व केवळ कागदांपुरते मर्यादित नाही, तर ते एक गुप्त असलेले ग्रंथामध्ये आहे ज्याला निसर्गानुरूप ग्रंथ म्हणतात. त्याची शिकवण पुसली जाणारी मिथक कथा नाही, परंतु जो कोणी ती समजून घेतो आणि आचरण करतो, त्याला सर्वशक्तिमान अल्लाहचे आशीर्वाद प्राप्त होते. त्याचा प्रभाव आणि त्याचे गूढ केवळ पवित्र लोकांवरच उलगडते आणि त्यासाठी पवित्र लोकांचा सहवास लाभणे आवश्यक आहे. या युगात, अपेक्षित मसीह (अ.स.) ज्याने सर्वशक्तिमान अल्लाहकडून ज्ञान प्राप्त केल्यानंतर, त्यांनी काय फरमाविले त्याकडे पाहणे आणि विचार करणे आवश्यक आहे.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की पवित्र कुरआनचे नाव जिक्र ठेवले गेले आहे कारण तो मानवाच्या आंतरिक नियमांची आठवण करून देतो, जो वेगवेगळ्या शक्तींच्या रूपात ठेवलेली आहे. नम्रता, पामरता, शौर्य, अतिरेक, क्रोध आणि समाधान अशा सर्व भाव जे ठेवण्यात आली, पवित्र कुरआन यांची आठवण करून देतो. सर्वशक्तिमान अल्लाहने सांगितले की, ''कुरआनच्या आयतींवर लक्ष द्या, काळजीपूर्वक विचार करा आणि त्यानुसार अंमल करा, हे तुम्हाला मानवी स्वभावाचे उच्च दर्जा दर्शवेल.'' त्यामुळे या दृष्टिकोनातून आपण पवित्र कुरआन वाचले पाहिजे आणि समजून घेतले पाहिजे. आज स्वातंत्र्याच्या नावाखाली

लहान मुलांच्या आणि मोठ्यांच्या मनात जे विष ओतले जात आहे, त्याद्वारे स्वतःला सुरक्षित ठेवू शकतात. जर आपण जमाअतच्या साहित्य आणि पवित्र कुरआनचे भाष्य वाचले, तर अहमदी पालक मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतील. आता तो काळ आला आहे ज्याबद्दल पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी भविष्यवाणी केली होती की, लोक कुरआन वाचतील परंतु कुरआन त्यांच्या घशातून खाली येणार नाही. हेच आम्ही आजकाल पाहत आहोत की, असंख्य निपुण वाचक (क़ारी), अनेक वाचक आहेत, पण त्यांची कृती यानुसार नाही. म्हणून माझी इच्छा आहे की मुस्लिमांनी शहाणे व्हावे आणि सर्वशक्तिमान अल्लाहने ज्या व्यक्तीला पाठवले आहे त्याच्याकडे लक्ष द्यावे, त्याचे ऐकावे, अंतःकरणात पहावे, काळाची गरज पहावे, मुस्लिमांची सामान्य परिस्थिती पहा आणि केवळ निरर्थक फतव्यांवर जोर देऊन इस्लामला बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका. पवित्र कुरआनचे सत्य समजून घ्या. तथापि, सर्व अहमदियांनी स्वतःचे मूल्यमापन नेहमी करत राहावे की, पवित्र कुरआनच्या शिकवणींचे सत्य आचरणात आणण्याचा प्रयत्न आम्ही कितपत करत आहोत आणि त्याच्यात प्रगती करण्यासाठी प्रयत्नशील आहेत की नाही. आजकाल, सोशल मीडियावर काही छोटे क्लिप पाहून निदर्शनास येते की लोकांना इस्लामची मूलभूत शिकवण आणि इतिहास सुद्धा माहित नाही. फक्त तथाकथित मौलवींच्या सांगण्यावरुन सन्मान पवित्र पैगंबर किंवा कुरआन किंवा सहाबाच्या नावाने अहमदिया जमातच्या विरोधात घोषणाबाजी करून नुकसान करण्याचा प्रयत्न केला जात आहे. बांगलादेशातून एका व्यक्तिने मला लिहिले की जेव्हा हल्लाखोर आले आणि त्यांनी हल्ला केला तेव्हा एक मुलगा दगडफेक करत होता. आमचा एक अहमदी म्हणाला: हे कुरआनात लिहिले आहे का? ही इस्लामची शिकवण आहे का?आम्ही तर कलमा उच्चारतो. त्याने लगेच दगड खाली टाकला. त्यामुळे असे लोक मौलवींच्या प्रोत्साहनावर काम करू लागतात. अल्लाह या दुष्ट लोकांच्या दुष्टतेपासून आमचे रक्षण करो आणि आम्हाला या रमजानमध्ये तसेच नंतरही पवित्र कुरआन समजून घेण्याची, शिकण्याची आणि आचरण करण्याची क्षमता देवो.

हुजूर अनवर म्हणाले: रमजानमध्ये प्रार्थना करण्याकडे विशेष लक्ष द्या. अल्लाह सर्वत्र सर्व अहमदींना प्रत्येक वाईटापासून वाचवो आणि अल्लाहच्या दृष्टीत जे बिघडलेले आहेत त्यांना इतरांसाठी एक उदाहरण बनव जेणेकरुन इतर अल्लाहच्या आदेशाचे पालन करू शकतील. सर्वसाधारणपणे जगासाठी प्रार्थना करा, अल्लाह जगाला युद्धाच्या आपत्तीपासून रक्षण करो (आमीन)

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अन्वर यांनी मौलाना मुन्नवर अहमद खुर्शीद साहेब प्रचारक, इकबाल अहमद मुनीर साहेब प्रचारक ऑफ पाकिस्तान यांच्या निधनानंतर त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घडामोडी आणि त्यांनी समाजासाठी केलेल्या सेवा यांचा उल्लेख केल्यानंतर म्हणाले: तिसरा उल्लेख श्री. सईदा नुसरत जहाँ बेगम साहिबा मियां अब्दुल अजीम दरवेश कादियान यांचे केले. दरवेशी काळातील ओडिशा प्रांतातील विवाहकरून येथे येणारी ती पहिली महिला होती. तिने दरवेशीच्या काळात आपल्या पतीसोबत संयमाने आणि कृतज्ञतेने जीवन व्यतित केला. ती एक चांगली आणि प्रामाणिक स्त्री होती. पवित्र कुरआनचे नियमित पठण करणारी आणि इतरांना शिकवणारी व्यक्ति होती. जनकल्याण सेवेची भावना ठळकपणे दिसून येत होती. कादियानमध्ये महिलांच्या अंत्यसंस्काराच्या निमित्ताने ती मोठी सेवा करत असे. खलिफाशी विशेष नाते होते. त्यांच्या पश्चात चार मुलगे आणि एक मुलगी असा परिवार आहे. खुर्शीद अनवर साहिब यांची दुसरी आई होत्या आणि मुअरखी-ए-अहमदियत दोस्त मुहम्मद शाहिद साहिब यांच्या काकू होत्या. अल्लाह त्यांच्यावर कृपा व क्षमा करो. शेवटी नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ.
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ.